महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर**
यांचे कार्यालय, ए. डी. सी.सी. बँक, ३ रा मजला, स्टेशन रोड, अहिल्यानगर
ईमेल आय डी: ddr_anr@rediffmail.com दुरध्वनी क्रमांक : ०२४१ २४५००५५

जा.क्रं./कृउबास/हमाली/तोलाई/दर निश्चीती/सन २०२५ /२७४२ दि. ०२/०५/२०२५

वाचावे:-१. मा.पणन संचालक , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.सीएमआर/आर/हमाली/ तोलाई /पणन -५ / १९८८ दिनांक ५/१/१९८९ व दिनांक २५/१/१९८९ तसेच जा.क्र.पणन -५/ हमाली /तोलाई/९१ दिनांक १९/९/१९९१ व दिनांक १४/१/१९९२

२. या कार्यालयाकडील जा.क्र.जिउनि/ वि-८/हमालतोलाई /दर निश्चीती/सन २०२२ दि.१६/०६/२०२२ चे परिपत्रक

३. मा.पणन संचालक , महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील जा.क्र.पणन-५/कृउबास/हमाली-तोलाई/दरठरविणे/ सूचना /२२/१३४६ दिनांक ३१ मार्च २०२२ चे परिपत्रक

## परिपत्रक

हमाली तोलाईचे दर तीन वर्षानी निश्चीत करण्याचे अधिकार मा.पणन संचालक , महाराष्ट्र राज्य पुणे यांनी या कार्यालयास प्रदान केलेले असून त्यानुसार वर नमुद वाचावे क्र. २ नुसार सदरचे दर तीन वर्षाकरीता म्हणजे दि.३१/३/२०२५ पर्यत निश्चीत केलेले होते. वाढती महागाई व त्यामुळे जीवनमानाचा खर्च सातत्याने वाढत असल्याने तसेच निश्चीत केलेल्या हमाली तोलाईची मुदत संपली असल्याने नव्याने दरवाढ करण्याबाबत कामगार संघटनाकडून हमाली तोलाईचे दरवाढ करणे बाबत मागणी करण्यांत आलेली आहे.

हमाली व तोलाईचे दर निश्चीत करणे संदर्भात या कार्यालयास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संबधीत घटकांची बैठक दि.०८/०४/२०२५, २२/०४/२०२५ रोजी या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती , दिनांक ०८/०४/२०२५, २२/०४/२०२५ रोजीच्या बैठकीत अध्यक्ष - जिल्हा हमाल पंचायत , कामगार प्रतिनिधी , कामगार अधिकारी , व्यापारी , हमाल , शेतकरी ,बाजार समितीचे सचिव , यांनी मांडलेले विचार यावरुन अहिल्यानगर जिल्हयातील सर्व बाजार समितीचे आवारातील क्षेत्रात शेतकरी शेतमालावरील हमाली तोलाईचेदर खालील प्रमाणे सुधारीत करण्यांत येत आहे.

| अ.नं. | तपशील | सुधारीत दर |
|---|---|---|
| १ | हमाली | ९.०० |
| २ | तोलाई | ६.६० |

या परिपत्रकान्वये निश्चीत केलेले दर तात्काळ लागू करावयाचे आहेत व त्यानंतर बाजार समितीने यथावकाश पोटनियम दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे.

वरील दरामुळे अहिल्यानगर जिल्हयातील सर्व बाजार समिती आवारातील तसेच अहिल्यानगर महापालिका हददीतील कृषि उत्पन्न बाजार समिती अहिल्यानगरचे जिल्हा हमाल पंचायतीशी संलग्न माथाडी कामगारांच्या शेतकरी हमाली तोलाईचे दर सारखे असतील हे दर दिनांक ३१/३/२०२८ पर्यत लागु राहतील.

(गणेश पुरी)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था अहिल्यानगर

कृषि उत्पन्न बाजार समिती
पारनेर,जि.अहमदनगर
आवक क्र---23---
दिनांक:- ४/५/२०२५ परिपत्रकाद्वारे आलेला आदेश देण्यात यावा

हमाल मापाई ८